# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 20/03/2023 (सोमवार) दुपार

---

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. काटोल :—** दिनांक १८/०३/२०२३ चे १३.३० वा. ते १९/०३/२०२३ चे १०.०० वा. चे सुमारास पो.स्टे. काटोल हद्दीत फिर्यादी यांची १७ वर्ष ०२ महिने अल्पवयीन नातीण हि १२ वी चा पेपर देण्याकरीता नबीरा कॉलेज काटोल येथे गेली असता ती पेपर देवुन घरी परत आली नाही तिचा गावात व इतर नातेवाईकांकडे शोध केला असता ती मिळुन आली नाही. तिला कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादीच्या कायदेशिर रखवालीतुन पळवुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी आगासे मो. न. ८४४६२८३९२५ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पो.स्टे. पारशिवनी** :— अंतर्गत ०६ कि. मी. अंतरावरील मौजा नयाकुंड शिवार आमडी फाटा ते पारशिवनी रोड येथे दिनांक १९/०३/२०२३ चे १३.४५ वा. ते १४.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— सुमित अशोक अवस्थी, वय २७ वर्ष, रा. नयाकुंड ता. पारशिवनी व त्याचे वडिल **मृतक नामे— अशोक रामदयाल अवस्थी** हे आपली होंडा शाईन मो. सा. क्र. एम.एच.—४०/सी.टी.—१९८२ ने आपले शेतात गेले होते शेतातील काम करून नयाकुंड येथे परत येत असता फिर्यादीने आपली मोटरसायकल रोडचे बाजुला उभे करून वडील मोटरसायकलवर बसत असतांना अचानक आमडी फाटा कडुन यातील ट्रक चालकाने आपले ताब्यातील वाहन कोळसा भरलेला ट्रक एम.एच.—४०/बी. एल. —२३१६ चा चालक **आरोपी नामे— गिरेंद्रकुमार सिताराम यादव, वय ४४ वर्षे रा. शिवना ता. सैतपूर जि. गांजिपुर उत्तरप्रदेश ह. मु. कन्हान** याने आपले ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे मोटरसायकलला मागुन जोरदार धडक मारली. सदर अपघातात फिर्यादीस किरकोळ मार लागला व फिर्यादीचे वडिलांच्या कमरेवरून ट्रक गेल्याने गंभिर मार लागुन जागीच मरण पावले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपी ट्रक चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३०४(अ) भादवि सहकलम १८४ १३४ मोवाका. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि. नागुलवार पो.स्टे पारशिवनी मो. नं. ९९२३३७२६४७ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर